


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526



https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २१९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.३० सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात मदत पोहचणार

### पुढच्या आठवड्यात घोषणा करू - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

राज्यात ६० लाख हेक्टरचं नुकसान अतिवृष्टीमुळे झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. ऑगस्टपर्यंत जे नुकसान झाले होते त्यासाठी राज्य सरकारने २ हजार २१५ कोटी रूपये वितरित करणे सुरू केले आहे. ज्या ज्या प्रकारचे नुकसान झाले आहे त्याबाबत सामुहिक धोरण तयार करू आणि पुढच्या आठवड्यात मदतीची घोषणा करू. ही सर्व मदत शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी त्यांच्या खात्यात मिळावी असा राज्य सरकारचा प्रयत्न आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गेल्या काही महिन्यात सातत्याने महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले त्याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत आम्ही आढावा घेतला. जवळपास ६० लाख हेक्टरचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यात ऑगस्टपर्यंत जे नुकसान झाले त्यासाठी २ हजार २१५ कोटी रूपये राज्य सरकारने वितरीत करणे सुरू केले आहे. ई-केवायसीची अट रद्द करून शेत नोंदीप्रमाणेच ही मदत होईल. पुढच्या २-३ दिवसांत सगळ्या



प्रकारची माहिती आमच्याकडे पोहचेल. काही ठिकाणी पाणी असल्याने योग्य आकडेवारी घेता येत नव्हती. तिथे आपण अधिकचा वेळ दिला आहे. २-३ दिवसांत ही माहिती पोहचेल. त्यानंतर शेतकऱ्यांना करावयाची मदत, जमीन खरडून गेलेली असेल त्याकरता मदत, विहिरींसाठी मदत, घरांची मदत असेल अशा वेगवेगळ्या नुकसानीबाबत सर्वसमावेशक धोरण आखून आम्ही मदत करणार आहोत असं त्यांनी सांगितले.

तसेच सगळी मदत शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी खात्यात मिळाली पाहिजे असा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. सातत्याने ओला दुष्काळाची मागणी होते. परंतु धोरणात कुठेही ओला दुष्काळाचा उल्लेख नाही. आजपर्यंत कधी ओला दुष्काळ जाहीर झाला नाही. मात्र ज्या वेळी दुष्काळ पडतो तेव्हा ज्या ज्या उपाययोजना आणि सवलती आपण देतो त्या सगळ्या सवलती यावेळी लागू करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. नुकसानाची आकडेवारी जमा झाल्यानंतर लवकरात लवकर याबाबत मदतीची घोषणा करू अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

दरम्यान, दिल्लीतून आपल्याला पूर्ण मदत होणार आहे. त्यासाठी आपला प्रस्ताव पाठवावा लागणार आहे. परंतु दिल्लीच्या मदतीची वाट न पाहता लागेल ती मदत आपण देतोय. त्याची भरपाई दिल्लीतून नंतर केली जाईल. केंद्राला एक प्रस्ताव पाठवता येतो, वारंवार पाठवता येत नाही. त्यामुळे संपूर्ण नुकसानीचा आढावा घेतल्यानंतर एक प्रस्ताव पाठवला जाईल असंही केंद्र सरकारच्या मदतीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले.

## अटक करण्यासाठी आलेल्या सीबीआय अधिकाऱ्यांना मारहाण

### उद्योजक मनोज जयस्वालसह चौघांवर गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०नागपूर**

कोट्यवधी रुपयांच्या बँक फसवणूक प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) कोलकाता युनिटने कारवाई करताना शहरातील उद्योजक मनोज जयस्वाल आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध सोमवारी गुन्हा दाखल केला. अटक करण्यासाठी आलेल्या सीबीआय अधिकाऱ्यांशी वाद घालत त्यांना मारहाण केल्याप्रकरणी सीताबर्डी ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



१९ सप्टेंबर रोजी सीबीआयचे पथक मनोज जयस्वाल यांना अटक करण्यासाठी नागपुरात आले होते. रामदासपेठ येथील हॉटेल तुली इम्पिरियलमध्ये असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथक पोहोचले. अटक वॉरंट दाखवताच जयस्वाल आणि त्यांचे साथीदार अधिकाऱ्यांशी उलट बोलू लागले. त्यांनी अपशब्द वापरत कारवाईला विरोध केला. निरीक्षक सौरभकुमार सिंह यांच्यासह इतर अधिकाऱ्यांना मारहाण केली.अखेर सिंह यांनी सीताबर्डी ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, धमकावणे व मारहाण करणे या कारणावरून गुन्हा नोंदविला आहे.

आरोपींमध्ये मनोज कुमार जयस्वाल, दिलीप कुमार सुखदेव साहू (रा. जे.पी. हाइट्स, आरबीआय ऑफिसर कॉलनी, बैरामजी टाउन), त्रिलोकसिंह जगतसिंह (रा. विनायक दर्शन बिल्डिंग, सेंट्रल पार्क) तसेच त्यांच्या एका साथीदाराचा समावेश आहे.

## आम्हाला वाटतंच होतं पाकिस्तान काहीतरी करेल

### सूर्यकुमार यादवने सांगितली टीम इंडियाच्या ड्रेसिंग रुममधील इनसाईड चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

आशिया कप स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पाकिस्तानच्या क्रिकेट टीमचा धुव्वा उडवणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याचे सोमवारी रात्री त्याच्या देवनार येथील निवासस्थानी आगमन झाले. यावेळी येथील नागरिकांनी सूर्याचे जल्लोषात स्वागत केले. त्याच इमारतीत राहणारे शिवसेनेचे माजी खासदार राहुल रमेश शेवाळे यांनी सोसायटीतील पदाधिकारी आणि परिसरातील जनतेसह सूर्यकुमार यादव याचे शाल, पुष्पहार आणि तिरंगा देऊन अभिनंदन केले. यावेळी सूर्यकुमाराचे औक्षणही करण्यात आले. त्यानंतर सूर्यकुमार याने शेवाळे यांच्या घरी विराजमान झालेल्या दुर्गामातेचे आशीर्वाद घेतले आणि चाहत्यांसोबत फोटोसेशन देखील केले. यानंतर सूर्यकुमार यादव याने 'एबीपी माझा'शी संवाद साधताना आशिया कप स्पर्धेतील भारतीय संघाच्या कामगिरीबद्दल



समाधान व्यक्त केले.


आशिया कप स्पर्धेतील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यावेळी असणाऱ्या दबावाबाबत सूर्यकुमार यादवने भाष्य केले. तो म्हणाला की, भारत-पाक सामन्यावेळ मैदानात थोडंफार प्रेशर नक्कीच असते. पण मी च्युईंगम आणि स्माईलच्या आड हे प्रेशर लपवतो. अनेकदा मी इतर सहकाऱ्यांशी बोलत राहतो, असे सूर्याने सांगितले. पहिल्या सामन्यात पराभव झाल्यानंतर पाकिस्तानी खेळाडूंना वैफल्य आले होते. याच वैफल्यामुळे ते मैदानात आणि पत्रकार परिषदांमध्ये वेगळंच काहीतरी बोलत होते. या सगळ्या गोष्टींमुळे कितीही नाही म्हटले तर लक्ष विचलित होण्याची शक्यता होती. त्यामुळे आम्ही सगळ्यांनी एकत्र बसून ठरवले की, आपण सर्व फोकस फक्त क्रिकेटवर ठेवू. त्यांना जे करायचंय ते करु दे. आशिया कप स्पर्धेतील सामना जिंकल्यानंतर आम्हाला असं वाटत होतं, तिकडून काहीतरी येणार, आम्ही सुपर-४ मध्ये खेळणार तेव्हा किंवा फायनलमध्ये येणार तेव्हा. पण आम्ही चांगल्या दर्जाचे क्रिकेट खेळायचे ही एकच गोष्ट डोक्यात ठेवली होती, असे सूर्यकुमार यादव याने सांगितले.आशिया चषक जिंकल्यानंतर मला खूप चांगलं वाटत आहे. ही स्पर्धा संपल्यानंतर टीम इंडियातील सर्व खेळाडूंना घरी जाण्याचे वेध लागले होते. माझे विमान दोन दिवसांनी होते. मात्र, मी आजच घरी आलो. आशिया चषक स्पर्धेचा दौरा मोठा असल्याने जवळपास २५ दिवस आम्ही घरापासून लांब आहोत.असे सूर्यकुमार यादव याने सांगितले.

## अमरावती विभागातील शिक्षक मतदार संघात मतदार नोंदणी कार्यक्रम जाहीर

### ३० सप्टेंबर ते ६ नोव्हेंबरपर्यंत पात्र शिक्षकांनी मतदार नोंदणी करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

भारत निवडणूक आयोगाने दि. ०१ नोव्हेंबर या अर्हता दिनांकावर आधारित अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. विभागीय आयुक्त हे शिक्षक मतदार नोंदणी करण्यासाठी मतदार नोंदणी अधिकारी म्हणून कार्यरत राहतील. तसेच सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी हे त्या त्या जिल्ह्यासाठी काम करतील. भारत निवडणूक आयोगाने शिक्षक मतदार नोंदणी करण्यासाठी अमरावती विभागातील शिक्षक विधानपरिषद मतदारसंघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याच्या कार्यक्रम घोषित केला आहे. सदर पुनरिक्षण कार्यक्रमांचे टप्पे व कालावधी खालीलप्रमाणे आहे.मंगळवार, दि. ३० सप्टेंबर रोजी मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१(३) अन्वये मतदार नोंदणी जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. दि. १५ ऑक्टोबर रोजी मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१(४) अन्वये वर्तमान




पत्रातील नोटीसीची प्रथम पुर्नप्रसिध्दी करण्यात येईल. दि. २५ ऑक्टोबर रोजी मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम ३१(४) अन्वये वर्तमान पत्रातील नोटीसीची व्दितीय पुर्नप्रसिध्दी करण्यात येईल. दि. ६ नोव्हेंबर रोजी प्रकरणपरत्वे नमूना १८ किंवा १९ व्दारे अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक राहील. दि. २० नोव्हेंबर रोजी, हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई होईल. दि. २५ नोव्हेंबर, रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी करण्यात करण्यात येईल. दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी हा २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर राहील. तसेच दि. २५ डिसेंबर रोजी, दावे व हरकती निकाली काढण्यात येणार व पुरवणी यादी तयार करणे व छपाई करणे आदी कामे केल्या जाईल. दि. ३० डिसेंबर रोजी मतदार यादीची अंतीम प्रसिध्दी केल्या जाईल.

अमरावती विभागातील सर्व तहसिलदार यांना पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यामुळे पात्र शिक्षकांनी विहीत नमुन्यात मतदार नोंदणी करिता संबंधित तहसिल कार्यालयामध्ये नमूना १९ मधील अर्ज दि. ३० सप्टेंबर ते ०६ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत सादर करावा, असे शिक्षक मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी तथा विभागीय आयुक्त अमरावती यांचे वतीने अपर आयुक्त रविंद्र हजारे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे आवाहन केले आहे.

## दसरा मेळाव्याचे निमित्त ठाकरे बंधू पुन्हा एकत्र

### शिवाजी पार्कवरुन होणार शिवसेना-मनसे युतीची घोषणा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

राज्यात आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एकीकडे ठाकरे बंधूंच्या युतीची चर्चा पुढे सरकत असताना दुसरीकडे शिवसेनेचा दसरा मेळावा येत्या २ ऑक्टोबरला होत आहे. शिवतीर्थावर पार पडणाऱ्या ठाकरेंच्या शिवसेनेच्या मेळाव्याला मनसे अध्यक्ष राज ठाकरे येणार का? त्यांना निमंत्रण दिले जाणार का? या दसरा मेळाव्याला युती संदर्भात निर्णय जाहीर केला जाणार का?




अश्या अनेक चर्चा सुरू आहेत. त्यामुळे युती संदर्भात निर्णय घेण्यासाठी खरंच या दसऱ्याचा मुहूर्त साधला जाणार का? किंवा या दसरा मेळाव्याला पुन्हा एकदा दोन भाऊ एकत्र दिसणार का? दसऱ्याला दोन बंधूंच्या वैचारिक सोन्याचं आदान-प्रदान होणार का? यासंदर्भात राजकीय अंदाज काय आहेत हे पाहुया, तशा प्रकारचा घटनाक्रम देखील दिसून येईल.

शिवसेना दसरा मेळाव्याची परंपरा, पक्षाचे नियम, पक्षाचा मेळावा या सगळ्यामुळे जरी दसरा मेळाव्याला राज ठाकरे यांना निमंत्रण देण्यास किंवा व्यासपीठावर आणण्यास काही मर्यादा येत असल्या तरी या दसऱ्याच्या मुहूर्तावर संजय राऊत म्हणतात तसं वैचारिक सोन्याचा आदान-प्रदान दोन बंधूंमध्ये होणार? पुन्हा एकदा दोन भावांची भेट दसरा सणाच्या दिवशी पाहायला मिळणार का? युती संदर्भातल्या चर्चांमध्ये पुढे जाऊन एक महत्त्वाचं पाऊल दसरा मेळाव्याच्या निमित्ताने उचलले जाणार का? याकडे विशेष लक्ष असणार आहे.


शिवसेनेच्या दसरा मेळाव्याला ५८ वर्षाची परंपरा आहे, या दसरा मेळाव्यात आधी शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे हे विचारांचे सोनं वाटून शिवसैनिकांनी आशीर्वाद द्यायचे. आता, शिवसेना पक्षप्रमुख हे दसरा मेळाव्याला भाषण करून पक्षाच्या कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना नेत्यांना दिशा देतात आणि विचारांचा सोनं राज्यभरातून आलेला शिवसैनिक दसरा मेळाव्याच्या निमित्ताने लुटतो.

## असदुद्दीन ओवेसींची अहिल्यानगर येथील सभा रद्द

### इम्तियाज जलील यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अहिल्यानगर**

रस्त्यावर काढलेल्या एका आक्षेपार्ह रांगोळीवरून अहिल्यानगरात सोमवारी प्रचंड तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर आज येथे एमआयएम अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांची सभा होणार होती. पोलिसांनी कालच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ओवेसींच्या सभेला १२ अटींसह सशर्त परवानगी दिली होती. त्यामुळे ओवेसींच्या आजच्या सभेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. पण आता ही सभाच रद्द झाल्याची माहिती एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी दिली आहे.



अहिल्यानगर येथे सोमवारी आय लव्ह मोहम्मद असा उल्लेख असणारी रांगोळी काढण्यात आली होती. या रांगोळीवरून दुर्गामाता दौडीचे आयोजन करण्यात आले होते. या मुद्यावरून शहरात मोठा तणाव निर्माण झाला होता. या प्रकरणी मुस्लिम समाजाने पुणे - छत्रपती संभाजीनगर महामार्ग रोखून धरला. त्यामुळे पोलिसांवर बळाचा वापर करण्याची वेळ आली. या घटनेच्या दुसऱ्याच दिवशी आज मंगळवारी सायंकाळी ५ वा. अहिल्यानगरच्या मुकुंदनगर भागात असदुद्दीन ओवेसी यांची सभा होणार होती. पण आता ही सभा रद्द झाली आहे. एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी ही माहिती दिली.

**पोलिसांच्या विनंतीनुसार सभा रद्द - इम्तियाज जलील**

इम्तियाज जलील म्हणाले, आज अहिल्यानगरात बॅरिस्टर असदुद्दीन ओवेसींची सभा होणार होती. या सभेची सर्व तयारी पूर्ण झाली होती. आम्हाला पोलिसांची परवानगी मिळाली होती. पण काल तिथे दगडफेक व लाठीचार्ज झाला. त्यानंतर जवळपास ४० तरुणांना ताब्यात घेण्यात आले. हे तरुण सध्या पोलिस कोठडीत आहेत. हे प्रकण अजून गरम असल्यामुळे तेथील पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे व नाशिकचे आयजी दत्तात्रय कराळे यांनी आम्हाला ही सभा लांबणीवर टाकण्याची विनंती केली होती. त्यांनी हा निर्णय आमच्यावर सोडला होता असे हि ते म्हणाले.

## ऐन दिवाळीत 'एसटी'चा प्रवास १० टक्क्यांनी महागणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

ऐन दिवाळीच्या काही दिवसांआधीच एसटीचा प्रवास महागणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एक महिन्याच्या कालावधीकरिता प्रवास भाड्यात १० टक्के वाढ केली आहे. शिवनेरी वगळता इतर सर्व प्रकारच्या बसेससाठी २५ ऑक्टोबरपासून दरवाढ लागू केली जाणार आहे.

एसटी महमंडळाने साधी, निमआरनि, शयन, आसनी, शयनयान वातानुकूलित, शिवाई, शिवशाही (आसनी) आणि जनशिवनेरी बससेवेसाठी भाडे वाढवले आहे. एक महिन्यासाठी ही भाडेवाढ कायम राहणार आहे. हंगाम संपल्यानंतर २६ नोव्हेंबरपासून भाडे पूर्ववत होणार आहे. सहा किलोमीटरचा एक टप्पा असल्याने त्यानुसार साध्या बसचे भाडे ८.७० रुपये आहे. त्यात दहा टक्के वाढ झाली असल्याने ९.५५ रुपये म्हणजे १० रुपये एका टप्प्यासाठी मोजावे लागणार आहेत.




**१० टक्के भाडेवाढ**

साधी आणि जलदचे तिकीट सध्या प्रति टप्पा (६ किमी) ८.७० रुपये आहे. ते आता ९.५५ रुपये होईल. निमआराम, स्लिपर ११.८५ वरून १३.०५ रुपये होणार. ई बसचे तिकीट सध्या १२.३५ रुपये आहे ते १३.६० रुपये होणार. शिवाई व शिवशाहीचे तिकीट १२.३५ वरून १३.६० होणार. शिवनेरीचे तिकीट १२.९५ वरून १४.२५ रुपये होणार.

## आघाडीत गेल्यापासून उद्धव ठाकरेंना मदतीचा विसर - आमदार संजय गायकवाड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० बुलढाणा**

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या काळातील शिवसेना महाराष्ट्र संकटात आल्यावर मदतीसाठी धावून जायची. मात्र उद्धव ठाकरे हे काँग्रेसच्या वळचणीला गेल्यापासून अन आघाडीत गेल्यापासून मदतीची ही परंपराच बंद झाली आहे. किंबहुना त्यांना याचा विसरच पडला आहे.

विरोधकांचेही असेच असून त्यांनी सरकारवर नुसतीच टीका न करता शेतकऱ्यांना मदत करावी. काँग्रेसनेही मदतीचा हात द्यावा. विरोधकांनी सरकारला फुकटचे सल्ले देणे बंद करावे असे टिकास्त्र शिवसेना (शिंदे गट) आमदार संजय गायकवाड यांनी सोडले. मलकापूर मार्गावरील आपल्या मातोश्री संपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी आपण २५ लाख रुपयांचे योगदान देत असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. यासाठी आपण बुलढाण्यातील आपले दोन प्लॉट विकून ही रक्कम उभारल्याचा दावाही त्यांनी केला. या दाव्याची पुष्टी करण्यासाठी त्यांनी यावेळी खरेदी विक्री खत आणि २५ लाखांची रक्कमही दाखवली. आज मंगळवारी, ३० सप्टेंबर रोजी दुपारी ही पत्र परिषद आयोजित करण्यात आली होती.

## संपादकीय ......

# पाकिस्तानला पाजले पाणी!

*भारत - पाकिस्तानमध्ये आशिया चषक २०-ट्वेंटी स्पर्धेत गट टप्प्यात आणि सुपर फोरमध्ये मिळून दोन सामने खेळवले. दोन्ही वेळेस भारतीय संघाने पाकिस्तानवर सहज विजय मिळवला. त्यानंतर कुलदीप यादवच्या भेदक फिरकी मार्यानंतर तिलक वर्माने साकारलेल्या झुंजार खेळीच्या जोरावर भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानला अंतिम सामन्यात ५ गडी राखून पुन्हा धूळ चारत आशिया चषक २०-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेवर नाव कोरले आणि त्यांचे नाक कापले.*

*बक्षीस वितरण सोहळ्यात भारतीय संघाने पाकिस्तानला प्रत्युत्तर देण्याचा पवित्रा कायम ठेवला. आशियाई क्रिकेट कौन्सिलचे अध्यक्ष मोहसीन नक्वी हे पाकिस्तानचे आहेत आणि विशेष म्हणजे ते देशाचे गृहमंत्रीही आहेत. ते सतत भारतविरोधी गरळ ओकत असतात. त्यामुळे भारतीय संघाने करंडक स्वीकारण्यास नकार दिला. ज्यांचे हात पहलगाममधील निष्पाप भारतीयांच्या रक्ताने माखले आहेत, त्यांच्या हातून चषक घेण्याचे भारतीय संघाने टाळले, हे निश्चितच अभिनंदनीय आहे. शिवाय कर्णधार सूर्यकुमार यादवने संपूर्ण स्पर्धेत मिळालेले सामना शुल्क भारतीय लष्कराला समर्पित केले हे कौतुकास्पद मानावे लागेल. गेल्या वर्षीही २०-ट्वेंटी विश्वचषक जिंकणार्या भारतीय संघाने आता सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली आशियातील वर्चस्व सिद्ध केले. संघाचे आशिया चषकातील हे नववे आणि २०-ट्वेंटीमधील दुसरे जेतेपद ठरले. स्पर्धेतील यापूर्वीच्या दोन्ही सामन्यांवेळी मोठे वाद झाल्याचे पाहायला मिळाले. भारतीय संघाने पाकिस्तानशी हस्तांदोलन न करण्याचा निर्णय घेतला; तर त्यांच्या खेळाडूंनी दुसर्या सामन्यात काहीही कारण नसताना भारतीय खेळाडूंशी वाद घातला आणि 'ऑपरेशन सिंदूर'संबंधित तणावात्मक स्थितीतील काही घटनांना अनुलक्षून आक्षेपार्ह हातवारे केले.*

*गेल्यावेळच्या दोन सामन्यांतील विजयसुद्धा सूर्यकुमारने पहलगाम हल्ल्यातील मृत व्यक्तींच्या कुटुंबांना आणि लष्कराला समर्पित केला होता. त्याच्या या वक्तव्यास आक्षेप घेत पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) आयसीसीकडे तक्रार केली होती. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत पाकिस्तान आता आपल्या दृष्टीने फारसा महत्त्वाचा नाही, असा शेरा सूर्यकुमारने मारला होता. आशिया कपमध्ये दोन्ही संघ २१ वेळा एकमेकांसमोर आले. त्यापैकी १२ वेळा भारताने विजय मिळवला, तर पाकने सहावेळा. तीन सामने बरोबरीत सुटले. त्यामुळे पाकिस्तान बरोबरीच करू शकत नाही, असे सूर्यकुमार बोलला आणि त्याप्रमाणे अंतिम सामन्यात तसे घडलेही! दुबईत झालेल्या अंतिम सामन्यात सूर्यकुमारने नाणेफेक जिंकून पाकिस्तानला फलंदाजीचे आमंत्रण दिले. मात्र बिनबाद ८४ अशा चांगल्या सुरुवातीनंतर पाकिस्तानचा डाव कुलदीप, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती या फिरकी त्रिकुटासमोर गडगडला.*

*अवघ्या १९.१ षटकांत १४६ धावांमध्ये पाकच्या संघाचा खुर्दा उडाला. जखमी अष्टपैलू हार्दिक पंड्याच्या अनुपस्थितीत अंतिम लढतीत दुबेला 'पॉवर प्ले'मध्ये गोलंदाजी करावी लागली. सुरुवातीच्या षटकात दुबे - जसप्रीत बुमराहविरुद्ध पाकचे सलामीवीर साहिबझादा फरहान आणि फखर झमानने तडाखेबंद फलंदाजी केली. या दोघांनी ९.४ षटकांतच ८४ धावा काढल्या. पण चक्रवर्तीने चतुराईने फरहानला बाद करत ही भागीदारी मोडीत काढली आणि इथूनच भारतीय गोलंदाजीने कमाल दाखवली. भारतीय फिरकीपटूंनी पाकच्या फलंदाजांची त्रेधा उडवली. कुलदीपने तर एका षटकात तीन गडी बाद केले. पाकिस्तानचा कर्णधार सलमान आगा, शाहीन शाह आफ्रिदी आणि फहीम अश्रम यांना बाद करून पाकचे मानसिक खच्चीकरण केले. बुमराहनेही २/२५ असा प्रभावी मारा केला. प्रत्युत्तरात भारताची सुरुवात निराशाजनकच ठरली. भारताने २० धावांतच ३ गडी गमावले. लयीत असलेला अभिषेक शर्मा (५), कर्णधार सूर्यकुमार (१) आणि शुभमन गिल (१२) यांना झटपट गमावले. मात्र तिलक आणि सॅमसनने चौथ्या गड्यासाठी ५० चेंडूंत ५७ धावांची भागीदारी करत संघाला विजयी मार्गावर नेले. तिलकने ४१ चेंडूंत अर्धशतक झळकावत भारताच्या विजयात मोलाची कामगिरी केली. त्याला प्रथम सॅमसन आणि मग शिवम दुबेची साथ लाभल्यामुळे भारताला जेतेपद मिळवता आले.*

*पाकिस्तान संघाचे माध्यम व्यवस्थापक नईम गिलानी यांनी या संवादाची चित्रफीत तयार करून ती व्हायरल केली. खरे तर सामन्यापूर्वी खेळाडू व सामना अधिकार्यांसाठीच राखीव असलेल्या ठिकाणी जाण्याची परवानगी संघाच्या माध्यम व्यवस्थापकांना नसते. याची माहिती देऊनही गिलानीने तेथे जात चित्रफीत बनवली. आयसीसीने याबाबत रास्त आक्षेप घेतला होता. दुसरीकडे, मैदानावर पाकिस्तानच्या तुलनेत भारताने सातत्याने सरस कामगिरी केली. आपल्या संघाने यंदाच्या आशिया चषकातील एकही पराभव न स्वीकारता आधीचे सहाही सामने जिंकले; तर पाकिस्तानला सहापैकी चारच सामने जिंकता आले.पहलगाम हल्ल्यानंतर दोन्ही देशांचे संबंध आणखीनच बिघडले असून त्याचे पडसाद मैदानावरही उमटलेत. गेल्या सामन्यात आक्षेपार्ह कृती केल्याबद्दल पाकचा वेगवान गोलंदाज रौफवर दंडात्मक कारवाई झाली. मात्र सूर्यकुमारने राजकीय शेरेबाजी केली म्हणून त्यास दंड ठोठावला.*

*अर्थात त्याच्याबाबतच्या या निर्णयाविरोधात भारताने अपील केले. भारताच्या ७ लढाऊ विमानांचे नुकसान केल्याचा बोगस दावा करणारे पाकचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना संयुक्त राष्ट्रांत भारताच्या कायमस्वरूपी राजदूत पेटल गहलोत यांनी नुकतेच फटकारले. रणभूमीप्रमाणेच आता मैदानातही भारताने पाकिस्तानचा पुन्हा मुखभंग केला.*

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे

# राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अमरावती**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) च्या वतीने दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी रा.से.यो. दिन मोठ्या उत्साहात, शिस्तबद्धतेने आणि सेवाभावाने साजरा करण्यात आला.

१९६९ पासून २४ सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा केला जातो. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमास प्राचार्य डॉ. ए. एम. महल्ले, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. पी. बिजवे, प्रा. डॉ. पी. एल. पाईकराव, प्रा. आर. व्ही. मांटे, प्रा. एन. जी. गाडगे, प्रा. एस. पी. टाक, सर्व स्वयंसेवक विद्यार्थी आणि महाविद्यालयातील विविध पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. वर्षभरातील कार्याचा गौरव करत, विशेष निवसी शिबिरात सक्रिय सहभाग नोंदविणाऱ्या प्राध्यापकांना प्राचार्यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रे देण्यात आली.

स्वयंसेवकांच्या कार्याची दखल घेत रा.से.यो. सचिव श्री रुद्रेश देशमुख यांच्यासह अनेक स्वयंसेवकांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात रा.से.यो.च्या वर्षभरातील उपक्रमांची झलक दर्शविणारे वार्षिक मासिक प्रकाशित करण्यात आले. प्राचार्य डॉ. महल्ले यांच्या प्रेरणादायी भाषणाने उपस्थितांमध्ये समाजासाठी काम करण्याची नवी ऊर्जा संचारली. कार्यक्रमानंतर परिसरातील 'थिंक टँक' भागात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. स्वयंसेवकांसह शिक्षक आणि मान्यवरांनीही सहभाग नोंदवला. या उपक्रमाने रा.से.यो.चा स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे दिला.

या उत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये निस्वार्थ सेवा, सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वगुण विकसित झाले असून, हे युवक भविष्यातही समाजासाठी झटतील, असा विश्वास या कार्यक्रमातून निर्माण झाला.

## आरोग्य संपदा आहार विशेष

### गांजापासून बनवलेल्या औषधाने पाठदुखी होते कमी; नव्या अभ्यासात निष्कर्ष



**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक** - गांजाच्या वनस्पतीपासून तयार करण्यात आलेल्या औषधाने तीव्र पाठदुखी कमी केल्याचे एका मोठ्या वैद्यकीय अभ्यासातून समोर आले आहे. या निष्कर्षामुळे दीर्घकालीन वेदनांवर गांजाचा वापर उपयुक्त ठरू शकतो, याला आणखी आधार मिळाला आहे. या संशोधनाचे निष्कर्ष नेचर जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. जर्मनीतील 'व्हटनिकल' या औषधनिर्मात्या कंपनीने केलेल्या ८०० रुग्णांवरील अभ्यासात गांजाचे चिकित्सक गुणधर्म स्पष्ट झाले. अमेरिकेत गांजा अजूनही केंद्रीय कायद्यानुसार अवैध असला तरी, अनेक राज्यांनी त्याला वैद्यकीय वापरासाठी मान्यता दिली आहे.

**नवीन अभ्यासात काय आढळले?** नवीन अभ्यासासाठी, पाठदुखी असलेल्या रुग्णांना दोन गटात विभागण्यात आले. एकाला व्हटनिकलचा खास गांजाचा अर्क तर दुसऱ्याला प्लेसबो (साधे औषध) देण्यात आले. १२ आठवड्यांनंतर औषध घेणाऱ्या रुग्णांच्या वेदनांमध्ये ११ पैकी जवळपास २ गुणांनी घट झाली, तर प्लेसिबो गटात ती घट १.४ गुणांवर होती. या औषधामुळे रुग्णांची झोप आणि शारीरिक कार्यक्षमता देखील सुधारल्याचे दिसून आले.

या औषधाचे दुष्परिणाम (उदा. चक्कर, डोकेदुखी) होते, ज्यामुळे त्यामुळे १७% रुग्णांना औषध थांबवावे लागले. मात्र, हे प्रमाण ओपिओइड्सच्या रुग्णांपेक्षा कमी होते.

६ महिन्यांच्या पुढील टप्प्यात औषध सुरू ठेवणाऱ्या रुग्णांच्या वेदना आणखी कमी झाल्या. संशोधनाचे निष्कर्ष नेचर जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहेत.

व्हटनिकल कंपनीने युरोपातील नियामकांकडे त्यांच्या औषधाच्या मंजुरीसाठी अर्ज दाखल केला आहे.

# घरगुती मिरची शेतातील कीड नियंत्रणासाठी फायदेशीर

## कशी ते जाणून घेऊ या

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक**

रासायनिक खतांबद्दल जागरूकता वाढत असताना, किफायतशीर आणि पर्यावरणपूरक कीटक नियंत्रण उपाय शोधण्यासाठी अनेक सेंद्रिय पर्याय महत्त्वाचे ठरू शकतात. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की घरच्या जेवणाला चव देणारी मिरची तुमच्या शेतातील कीटक व्यवस्थापनासाठी देखील प्रभावी ठरू शकते?

कॅप्सेसिन हा मिरचीमध्ये एक सक्रिय घटक आहे आणि तो कॅप्सिकम वंशाच्या वनस्पतींपासून मिळतो. मिरचीचा तिखटपणा सेंद्रिय कॅप्सेसिनमुळे असतो, जो अनेक पिकांचे नुकसान करणाऱ्या कीटकांविरुद्ध प्रभावी पर्याय ठरू शकतो. नेमकं कसं काय, जाणून घेऊयात...

**ते कसे कार्य करते**

कॅप्सेसिन हे ऍफिड्स, लूपर्स, आर्मीवर्म्स, स्पायडर माइट्स, थ्रिप्स, लीफमायनर्स आणि व्हाईटफ्लायज यांच्या विरोधात प्रभावी आहे.

वनस्पतींच्या पृष्ठभागावर लावल्यास ते कीटकांना वनस्पतीपासून दूर आणि मातीच्या पृष्ठभागाकडे जाण्यास प्रोत्साहित करते.

ते प्रौढ कीटकांमध्ये अंडी घालण्याची क्रिया कमी करू शकते.

ते कीटकांच्या चयापचयात व्यत्यय आणू शकते, त्यांच्या मध्यवर्ती मज्जासंस्थेवर परिणाम करू शकते.

ते कीटकांच्या पेशींच्या पडद्यांना नुकसान पोहोचवू शकते, त्यांच्यामध्ये छिद्रे निर्माण करू शकते.

याचा अर्थ असा की कॅप्सेसिन केवळ कीटकांना दूर ठेवत नाही तर त्यांना कमकुवत करते आणि मारते.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

कॅप्सेसिनचा वापर कीटक नियंत्रण उत्पादनांमध्ये केवळ सक्रिय घटक म्हणून केला जाऊ शकतो.

ते कडुलिंबाचे तेल, लसूण तेल किंवा सोयाबीन तेल यासारख्या इतर घटकांसह मिसळता येते.

कॅप्सेसिन उत्पादने दाणेदार, धूळ आणि द्रव यासह विविध स्वरूपात उपलब्ध आहेत.

**कसे वापरावे**

नियमितपणे आणि कीटकांच्या थेट संपर्कात वापरा.

आठवड्यातून एकदा फवारणी करा.

कमी कीड नियंत्रणासाठी कमी वापर, तर जास्त किडीच्या नियंत्रणासाठी अधिक वापर

पाऊस पडल्यास फवारणी पुन्हा करा.

**काही खबरदारी घेणे आवश्यक**

कॅप्सेसिन हे मधमाश्यांसाठी धोकादायक ठरू शकते. म्हणूनच ते वापरताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. शिवाय ते आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. कॅप्सेसिन-आधारित उत्पादने वापरताना लांब बाह्या, लांब पँट, हातमोजे, मोजे, शूज आणि गॉगल घालावेत.

# व्हिस्की रिचवण्यात कर्नाटक नंबर वन; तर जाणून घ्या महाराष्ट्र कितव्या क्रमांकावर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०नवी दिल्ली;** भारतीय बनावटीचे विदेशी मद्य (आयएएमएफएल) रिचवण्यात कर्नाटक राज्य देशात अव्वल आहे. विशेष म्हणजे, भारतातील मद्य बाजारात दाक्षिणात्य राज्यांची वरचढ पाहायला मिळत आहे. २०२४-२५ या आर्थिक एएमएफएल विक्रीत एकट्या कर्नाटक राज्याच्या सर्वाधिक १७ टक्के वाटा आहे. तर आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, तेलंगणा आणि पुदुचेरी या राज्यांचा तब्बल ५८ टक्के वाटा आहे. महाराष्ट्र देशात पाचव्या स्थानी असून राज्यात वर्षात २४ कोटी लिटर मद्य विक्री झाल्याची माहिती कन्फेडरेशन ऑफ इंडियन अल्कोहोलिक बेव्हरेज कंपन्यांनी (सीआयएबीसी) दिली आहे. सीआयएबीसी च्या अहवालानुसार, देशातील इतर सर्व राज्यांत ४२ टक्के मद्य विक्री झाली. या काळात व्हिस्कीच्या एकूण विक्रीत केवळ १.४ टक्क्यांची वाढ झाली. आर्थिक वर्ष २०२४ मधील ३९.६२ कोटी मद्य पेट्या (३५६.५८ कोटी लिटर) वरून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ४०.१७ कोटी मद्य पेट्या (३६१.५३ कोटी लिटर) विकल्या गेल्या. देशाच्या पश्चिमेकडील राज्यांचा मद्यविक्रीत १२ टक्के वाटा आहे. महाराष्ट्रात यात आघाडीवर असून राज्यात २.७१ कोटी मद्यपेट्यांची (२४.३९ कोटी लिटर) विक्री झाली. पश्चिमेकडील राज्यांचा विचार केल्यास महाराष्ट्राच्या वाटा तब्बल ५८ टक्क्यांचा आहे. तर राष्ट्रीय क्रमवारीत पाचव्या स्थानावर आहे.



# रेल्वेपूल हलक्या वाहनांसाठी सुरू करा

## पोलिसांचे बांधकाम व रेल्वे विभागाला पत्र



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती** - अमरावतीचा रेल्वे ओव्हरब्रिज बंद असल्यामुळे नागरिक व वाहनधारकांची चांगलीच तारांबळ होत असून त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित पूल पादचारी व दुचाकीच्या वाहतुकीकरिता सुरु करण्यात यावा, असे पत्र पोलिसांमार्फत बांधकाम व रेल्वे विभागाला देण्यात आले आहे.

रेल्वे ओव्हारब्रिज मागील एक ते दीड महिन्यापासून बंद असल्यामुळे अमरावतीकरांना नाहक त्रास सहन करावा लागत असून वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत आहे. तसेच नवरात्रौउत्सवदरम्यान अंबादेवी व एकवीरा देवी मंदिरात जाण्याकरिता महिलांसह नागरिकांना प्रचड त्रास होत आहे. संबंधित विभागाने एका ऑडिट रिपोर्टवर उड्डाणपूल बंद केला, दुसऱ्यांदा ऑडिट रिपोर्ट करण्याची आवश्यकता होती.

मात्र दुसरे आऑडिट न करता उड्डाणपूल पूर्णपणे बंद केला. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

रेल्वे उड्डाणपुलाखाली मालगाडी उभी राहते तसेच तसेच पुलाच्या खालून वाहनांची ये-जा सुरु असते, त्यामुळे सुध्दा धोकानिर्माण होऊ शकतो. यासर्व बाबी पाहता ज्या ठिकाणी उड्डाणपूल शिकस्त झाला आहे त्या ठिकाणी लोखंडी गर्डर किंवा बिम टाकून पुलाला आधार दिला तर पुलावरून पदचारी व दुचाकी वाहन जाऊ शकतात. त्यामुळे शहरात होणारी वाहतुकीची कोंडी कमी होईल.त्यामुळे पाट्टारी व उड्डाणपुलावरून करण्याकरिता पर्यायी दुचाकी सुरु मार्ग काढण्यात यावा, असे पत्र पोलीस विभागामार्फत दोन्ही विभागाला देण्यात आले आहे, असे पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी प्रसार माध्यमांना सांगितले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

मंगळवार दि. ३० सप्टेंबर २०२५

शहर/ग्रामिण


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाची दुरावस्था



## शासनाचे दुर्लक्ष, लोकप्रतिनिधींची उदासीनता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

अनुसूचित जाती व मागासवर्गीयांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी महाराष्ट्र शासनामार्फत विविध योजना राबवल्या जातात. या योजनांचा लाभ अधिक परिणामकारक पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हास्तरावर स्वतंत्र कार्यालये व महामंडळे कार्यरत आहेत. महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, चर्मोद्योग विकास महामंडळ, विमुक्त भटक्या जाती व जमाती महामंडळ अशा अनेक संस्थांमार्फत बेरोजगारांना अर्थसहाय्य, प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासिका, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम यांचा लाभ मिळतो. या सर्व सुविधा व विभागांची कामे एका छताखाली उपलब्ध व्हावीत, नागरिकांना सहज सेवा मिळावी आणि सामाजिक न्यायाच्या कार्याला गती मिळावी या हेतूने सन २००६ मध्ये तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री तथा राज्यसभेचे खासदार चंद्रकांत हंडोरे यांनी महाराष्ट्रातील सर्व ३५ जिल्ह्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन उभारण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. परंतु कालांतराने या भव्य इमारतींचे महत्त्व कमी न होता देखभाल मात्र पूर्णपणे दुर्लक्षित राहिली आहे. गेल्या पंधरा वर्षांत राज्यभरातील सामाजिक न्याय भवनांची अवस्था झपाट्याने खालावली असून, शासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे ही इमारती जी सामाजिक समतेचे प्रतीक मानल्या जात होत्या, त्या आज दुरवस्थेला सामोऱ्या जात आहेत. अमरावती जिल्ह्यातील पोलीस आयुक्त कार्यालयाच्या मागे उभारण्यात आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन याचेच ज्वलंत उदाहरण आहे. या भवनात नागरिकांसाठी व विविध कार्यक्रमांसाठी बांधण्यात आलेले सभागृह आज भग्नावस्थेत आहे. खुर्च्या तुटलेल्या असून कार्यक्रमांना येणाऱ्या मान्यवरांना बसण्यासाठीही योग्य व्यवस्था उरलेली नाही. प्रसाधनगृहातील नळ व टोट्या मोडलेल्या असल्याने स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. भिंतींना व छताला ठिकठिकाणी तडे गेले असून पावसाळ्यात गळती सुरू होते. मजल्यावरील टाईल्स ठिकठिकाणी तुटलेल्या आहेत, खिडक्या-दरवाजे मोडले आहेत, पायऱ्यांवरील रेलिंग सैल झालेली आहे आणि संपूर्ण इमारतीचा रंग उडाल्यामुळे भवनाला ओसाड, जीर्ण रूप आले आहे.अशा अवस्थेतही या भवनात अनेक कार्यक्रम होत असतात. परंतु कार्यक्रमाला हजेरी लावणारे मान्यवर व लोकप्रतिनिधी स्वतः या दुरवस्थेचे साक्षीदार होत असूनही, केवळ नाराजी व्यक्त करण्यापलीकडे कोणतीही ठोस पावले उचलली जात नाहीत. शासनाकडून आणि स्थानिक पातळीवर सातत्याने होत असलेले हे दुर्लक्ष खेदजनक आहे. या संदर्भात भीमशक्ती सामाजिक संघटना विदर्भ प्रदेशाध्यक्ष समाजभूषण पंकज ललित मेश्राम यांनी जाहीर इशारा दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ही केवळ भौतिक रचना नसून सामाजिक न्याय, समता आणि प्रबोधनाचे प्रतीक आहे. या इमारतीच्या दुरवस्थेकडे शासनाने तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. येत्या १४ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीपूर्वी इमारतीची दुरुस्ती व रंगरंगोटी पूर्ण झाली पाहिजे. अन्यथा शासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.या मागणीसंदर्भात मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, सामाजिक न्याय मंत्री ना. संजय सिरसाट, अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावणकुळे, सामाजिक न्याय विभागाचे सचिव, प्रादेशिक उपायुक्त श्रीमती माया केदार आणि सहाय्यक आयुक्त समाजकल्याण अमरावती श्री. राजेंद्र जाधव यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.आज ज्या उद्देशाने या इमारती उभारण्यात आल्या होत्या, त्या उद्देशालाच बाधा पोहोचत आहे. नागरिकांना सुलभ सेवा देणारे केंद्र बनावे म्हणून निर्माण झालेले सामाजिक न्याय भवन स्वतःच अन्यायग्रस्त झालेले दिसत आहे. शासन व लोकप्रतिनिधींनी आता तरी जागे होऊन या भवनाचे पुनरुज्जीवन केले नाही, तर जनतेतून तीव्र संतापाची लाट उसळण्याची चिन्हे आहेत.

# तलावात फेकलेल्या मृत कोंबड्यांमुळे आरोग्याच्या प्रश्न ऐरणीवर

## दहा दिवस उलटले तरी प्रशासन गाढ झोपेत, चिकनच्या दुकानांकडेही नागरिकांनी फिरवली पाठ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० नांदगाव पेठ-**

डिगरगव्हाण येथे पोल्ट्री फार्ममधील मृत कोंबड्या तलावात फेकण्याची घटना घडून दहा दिवस उलटून गेले, मात्र अजूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. परिणामी गावात भीतीचे सावट पसरले असून ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.ग्रामपंचायतच्या वतीने तलावाची साफसफाई करण्यात आली मात्र आरोग्य विभाग तसेच पशुसंवर्धन विभागाकडून कोणत्याही प्रकारची उपाययोजना करण्यात आलेली नाही. काही दिवसांपूर्वी पोल्ट्री फार्म मालक पांडुरंग माणिकराव कडू यांनी अज्ञात आजाराने मृत झालेल्या शेकडो कोंबड्या गावातील तलावात फेकल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली होती. या घटनेमुळे तलावाचे पाणी गंभीरपणे दूषित झाले. हेच पाणी गावकऱ्यांच्या दैनंदिन वापरासाठी असल्याने संपूर्ण गाव आरोग्याच्या भीषण संकटाच्या छायेत आले आहे.तलावातून दुर्गंधी पसरू लागली असून परिसरात आजारांचा फैलाव होण्याचा धोका अधिक गडद



झाला आहे. विशेष म्हणजे घटनेला दहा दिवस उलटले तरी आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग वा प्रशासनातील कुठल्याही अधिकाऱ्याने ठोस हालचाल केलेली नाही. या निष्क्रियतेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.दरम्यान, कोंबड्यांवर आलेल्या अज्ञात आजारामुळे नागरिक चिकन खाण्यापासूनही दूर राहत आहेत. मांस विक्रेत्यांच्या दुकानांवर शुकशुकाट असून पोल्ट्री व्यवसाय मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. नागरिकांमध्ये आरोग्याविषयी भीतीचे सावट पसरले असून विभागाने तात्काळ दखल घ्यावी अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे.

# बैरागड येथील वैद्यकीय अधिकारी सतत गैरहजर

## महिन्याला वेतन मात्र नियमित

## खोट्या स्वाक्षऱ्या करून काढले जाते वेतन

### ग्रामस्थांमध्ये संतापाचा ज्वालामुखी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

धारणी तालुक्यातील बैरागड प्राथमिक आरोग्य केंद्र हे आरोग्यसेवेसाठी स्थापन झालेले महत्त्वाचे केंद्र. मात्र, येथे नियुक्त असलेल्या महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रज्ञा भगवान वाकोडे (भगत) आणि त्यांचे पती डॉ. धम्मदीप भगत या दोघांचा गंभीर निष्काळजीपणा धक्कादायक आहे.डॉ. प्रज्ञा वाकोडे या रुग्णांना सेवा न देता, महिने- महिने मुख्यालयी गैरहजर राहूनही यांचे वेतन नियमितपणे काढले जात असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार डॉ. प्रज्ञा वाकोडे सलग दोन-दोन महिने केंद्रावर अनुपस्थित राहतात. त्या फक्त शासकीय सुट्यांच्या दिवशी बैरागडला येतात आणि कर्तव्यावर आहे असा आभास निर्माण करतात. प्रत्यक्षात अमरावतीत वास्तव्यास राहून मुलीच्या शिक्षण व संगोपनाचे त्या कर्तव्य निभावतात. याच काळात, हजेरी रजिस्टरवर खोट्या स्वाक्षऱ्या करून वेतन काढले जाते, असा आरोप स्थानिकांनी केला आहे.गंमत म्हणजे, इतकी मोठी गैरहजेरी असूनही ना तालुका वैद्यकीय अधिकारी, ना जिल्हा आरोग्य प्रशासन कारवाई करताना दिसत आहे. उलट या दोन्ही अधिकाऱ्यांचे दर महिन्याला पगार वेळेवर खात्यात जमा होतात हे विशेष! सामान्य कर्मचारी दोन दिवस गैरहजर राहिला तरी नोकरीवर गदा येते. मग बैरागड प्रकरणी अनेक महिने अनुपस्थित राहणाऱ्या या डॉक्टरांवर शासन मूक-बधीर का झाले आहे? त्यांना शासकीय सेवेत का सोसले जात आहे?हा प्रकार नवीन नाही तर गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे. आरोग्य केंद्रात सेवा ठप्प, गावकऱ्यांची अडचण वाढलेली आणि अधिकारी मात्र निवांत! या गंभीर प्रकरणामुळे बैरागड आरोग्य केंद्रावर प्रचंड प्रश्नचिन्ह उभे राहिले असून शासनाच्या कारभाराविषयी ग्रामस्थांमध्ये संतापाचा ज्वालामुखी उसळला आहे.



### मातामृत्यू व बालमृत्यूला डॉ. वाकोडेच जबाबदार

मागील पाच महिन्यात दहा बालमृत्यू व एक मातामृत्यू झाला. या आधी सुद्धा अनेक घटना उघडकीस आल्या. डॉ. प्रज्ञा वाकोडे या मुख्यालयी उपस्थित राहत नसल्यामुळे बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण वाढलेले आहे.प्रसूतीची सुविधा रुग्णालयात उपलब्ध असतांना त्यांना धारणी येथील उपजिल्हा रुग्णालयात रेफर करण्याचा प्रताप डॉ. वाकोडे व त्यांचे पती डॉ. भगत करतात त्यामुळे अनेकदा रस्त्यातच प्रसूती झाल्या आहेत. आजवर झालेल्या बालमृत्यू व मातामृत्यूला डॉ. वाकोडे जबाबदार असून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# माहिती अधिकार दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे जनजागृती कार्यक्रम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती-** माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत जनतेमध्ये जनजागृती होण्यासाठी दरवर्षी २८ सप्टेंबर हा माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जातो. तथापि, सन २०२५ चा माहिती अधिकार दिन हा शासकीय सुट्टीच्या दिवशी आल्यामुळे शासन निर्देशानुसार दि.२९ स्पटेंबर, २०२५ रोजी माहिती अधिकार दिन विभागीय आयुक्त कार्यालय येथे संपन्न झाला. यानिमित्ताने अधिकारी / कर्मचारी यांना माहिती अधिकार अंतर्गत महत्वाच्या तरतूदी व त्या अनुषंगाने जनजागृती करण्याच्या दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्र.अपर आयुक्त श्री. रविंद्र हजारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.




कार्यक्रमात तज्ञ मार्गदर्शक म्हणून ॲड. राजेंद्र रा. पांडे (यशदा, पुणे) यांना आमंत्रित करण्यात आले होते. ॲड. पांडे हे यशदा, इ-ठढख, महाराष्ट्र ज्युडिशियल ॲकेडमी, महाराष्ट्र पोलिस ॲकेडमी यांसारख्या संस्थांमध्ये मानद व अतिथी व्याख्याता असून, विविध महत्त्वपूर्ण प्रकरणांमध्ये शासन व अपिलार्थीच्या वतीने युक्तीवाद करतात.त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती अधिकार कायद्याविषयी सखोल मार्गदर्शन केले. माहिती मागविण्याची प्रक्रिया, जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांची कर्तव्य त्याच प्रमाणे अपिलीय अधिकारी, शासकीय उत्तरदायित्व याविषयी साध्या व सोप्या भाषेत माहिती दिली. त्यांनी सामान्य नागरिक हा केंद्रबिंदू मानून शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची भूमिका, अभिलेख व्यवस्थापन, आणि माहिती अर्जास सकारात्मक प्रतिसाद देण्याच्या पद्धती यावर सविस्तर प्रकाश टाकला.या कार्यक्रमाचे वेळी माहिती अधिकार क्यूआर कोडचे विमोचन कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते व कार्यक्रमाचे अध्यक्ष यांचे हस्ते करण्यात आले. सदर क्युआर कोडचे माध्यमातून नागरिकांना विभागीय आयुक्त कार्यालयातील सर्व शाखांची अद्ययावत माहिती उपलब्ध होणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पंकज कोंडे, महसूल सहाय्यक यांनी केले. श्री. रविंद्र हजारे, प्र.अपर आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांनी अध्यक्ष स्थान भषविले, तर आभार प्रदर्शन श्रीमती मनिषा ढोके, महसूल सहाय्यक यांनी केले.

# दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस दिला धनादेश

## शेतकरी हिताचे ठराव एकमुखी मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३० दर्यापूरः**

अलीकडील पूरस्थितीमुळे शेतकरी बांधवांवर ओढवलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत शेतकरी हिताचे महत्त्वपूर्ण ठराव एकमुखी मंजूर करण्यात आले. पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात म्हणून समितीच्या वतीने रुपये २५,०००/- चा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी तहसीलदार यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला.

या सभेत एकूण चार ठराव घेण्यात आले. ओल्या दुष्काळाची तात्काळ घोषणा करून शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात यावी, पूरग्रस्तांसाठी आर्थिक मदत देण्यात यावी,



शेतकऱ्यांचे तारणहार डॉ. पंजाबराव देशमुख यांना 'भारतरत्न' पुरस्कार देण्यात यावा, आणि नाफेडमार्फत विकलेला ज्वारीचा दुसरा हप्ता तात्काळ देण्यात यावा, अशी ठरावे सभेत मंजूर झाले.


या निर्णयांमुळे शेतकरी वर्गाच्या व्यथा शासनापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हे ठराव अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार मा. बळवंत वानखडे व जिल्हा सहकारी क्षेत्रातील ज्येष्ठ नेते मा. सुधाकर पाटील भारसाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पारित करण्यात आले. ठराव सुपूर्त करताना बाजार समितीचे सभापती मा. सुनिल गावंडे, उपसभापती श्रीकृष्ण उर्फ राजू पाटील कराळे, बाळासाहेब हिंगणिकर, अनिल पाटील भारसाकडे, गजानन पाटील देवतळे, प्रभाकर पाटील तराळ, अजय देशमुख आणि सहसचिव सुनिल कोकाटे आदी उपस्थित होते.

शेतकरी बांधवांच्या हितासाठी बाजार समितीने उचललेले हे पाऊल म्हणजे सामाजिक बांधिलकीचा उत्कृष्ट नमुना मानला जात आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न मिळावा, ही शेतकऱ्यांच्या भावना अधोरेखित करणारी ठरवली जात आहे.

# रेल्वे उड्डाणपूलाच्या सुरक्षिततेसाठी रेल्वेकडून तातडीच्या उपाययोजना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती-** राजकमल रेल्वे उड्डाणपूलाच्या सुरक्षिततेबाबत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिलेल्या निर्देशानुसार मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाने तातडीने कार्यवाही केली आहे. उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद असला तरी रेल्वे वाहतुकीच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्याचे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटनुसार हा पूल वाहनांच्या वाहतुकीकरिता असुरक्षित घोषित करण्यात आला आहे. त्यानंतर २५ ऑगस्ट २०२५ पासून या पुलावरील वाहनांची आणि पादचाऱ्यांची वाहतूक जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार बंद करण्यात आली आहे. पुलाखालून दररोज रेल्वे गाड्या धावत असल्याने संभाव्य आपत्तीचा धोका लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी रेल्वे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला संयुक्त पाहणी करून रेल्वे वाहतूक थांबवण्याबाबत किंवा वळवण्याबाबत अहवाल देण्याचे निर्देश दिले. त्यानुसार रेल्वे प्रशासनाने कार्यवाही केली आहे. रेल्वे विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग व स्ट्रक्चरल ऑडिट सल्लागार यांच्या संयुक्त पथकाने दि. १८ व १९ सप्टेंबर २०२५ रोजी पुलाची पाहणी केली. त्यानुसार राजकमल पुलाखालून रेल्वे वाहतुकीला कोणताही तात्काळ धोका नाही. संयुक्त पाहणी अहवालानुसार, पुलावर वाहनांची वाहतूक पूर्णपणे थांबविल्यामुळे त्यावर कोणतेही 'गतिमान भारण' नाही. सध्या हा पूल फक्त स्वतःचे 'डेड लोड' घेण्यास सक्षम आहे. त्यामुळे पुलाखालून धावणाऱ्या रेल्वे वाहतुकीला कोणताही तात्काळ धोका नाही. परिणामी सध्या रेल्वे वाहतूक थांबवण्याची किंवा वळवण्याची गरज नाही.पुलामुळे संभाव्य निर्माण होणारा अपघात लक्षात घेता २४ तास निगराणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. याबाबत रेल्वे विभागाने पुलाच्या ठिकाणी संरचनात्मक बिघाडाच्या सर्व चिन्हावर त्वरित लक्ष ठेवण्यासाठी पूर्णवेळ वॉचमन तैनात करण्यात आला आहे. शहराच्या वाहतुकीतील रेल्वे पुलाचे महत्व लक्षात घेता पुलाच्या पुनर्बांधणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. रेल्वे पुलाचे 'डिसमँटलिंग' म्हणजेच पाडकाम (रेल्वे स्पॅन) करण्याची योजना अंतिम करण्याच्या आणि त्यासाठीचा खर्च अंदाजित करण्याच्या प्रक्रियेत आहे. तसेच पुलावरील वाहतुकीचे महत्त्व लक्षात घेता वेळेची मर्यादा पाळण्यात येणार आहे. यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रेल्वे विभाग पुलाचे



पाडकाम अंदाजित चार महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.रेल्वे विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला आयआयटी, व्हीएनआयटीसारख्या संस्थांकडून पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्याची आणि 'टिल्ट मीटर्स', 'क्रॅक प्रोपगेशन गेजेस' यांसारख्या तांत्रिक मॉनिटरिंग प्रणाली बसवण्याची सूचना केली आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता प्रतीक गिरी, रेल्वेचे उपविभागीय अभियंता श्रीकृष्ण गोमकाळे, सहाय्यक अभियंता एन प्रकाश रेड्डी स्ट्रक्चरल ऑडिट सल्लागार कन्स्ट्रक्शन मॅजिक यांनी संयुक्तपणे रेल्वे पुलाची पाहणी केली. सार्वजनिक बांधकाम विभागाने पुलाची दोन भागात पाहणी केली. या पाहणीत बेलपुराकडील रेल्वे पुलाला बारीक तडे, तर रायली प्लॉटकडील संपूर्ण पुलाला तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र सद्यस्थितीत पुलावरून कोणतीही वाहतूक होत नसल्याने पुलाखालील वाहतुकीला कोणताही धोका नाही. त्यामुळे ही वाहतूक सुरळीत सुरू राहील. पुलावरील वाहतुकीला प्रतिबंध घालण्यात आल्यामुळे पुलाच्या दोन्ही बाजूला भिंत उभारण्यात आली आहे. या ठिकाणी सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्यात आल्या आहे. तसेच पुलाजवळ कोणत्याही प्रकारची वाहने उभी करण्यास मनाई करण्यात आली आहे.

रेल्वे पुल संरचनेच्या सुरक्षिततेची आणि देखरेखीची काळजी घेण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेल्या सूचना काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे. तसेच आवश्यक ती खबरदारी घेण्यासाठी निर्देश देण्यात आले आहे.

# अमरावती विद्यापीठाचा महत्त्वाचा निर्णय:शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांची परीक्षा फी माफ; कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली अधिसभेत प्रस्ताव मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने शेतकरी आणि शेतमजुरांच्या मुलांना दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यावर्षीच्या परीक्षांसाठी अशा विद्यार्थ्यांची फी माफ करण्याचा प्रस्ताव विद्यापीठाच्या अधिसभेत (सिनेट) मंजूर करण्यात आला. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली २९ सप्टेंबर रोजी झालेल्या सभेत हा निर्णय घेण्यात आला.




सिनेट सदस्य प्रताप अभ्यंकर यांनी हा प्रस्ताव मांडला होता. राज्यात अशा प्रकारचा निर्णय घेणारे अमरावती विद्यापीठ बहुधा पहिलेच ठरले आहे. यावर्षी राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला.

अमरावती विद्यापीठाचे कार्यक्षेत्र पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशीम आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांमध्ये आहे. या पाचही जिल्ह्यांतील ४४३ महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न आहेत, जिथे सुमारे ४.५० लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. यापैकी निम्म्याहून अधिक विद्यार्थी शेतकरी आणि शेतमजुरांची मुले असल्याने त्यांना या शुल्कमाफीचा थेट फायदा होईल.

यावर्षी सुरुवातीला पावसाची कमतरता आणि नंतर ऐन पीक बहरत असताना अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी विविध राजकीय पक्षांकडून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, संत गाडगेबाबांच्या नावाने असलेल्या विद्यापीठाची जबाबदारी अधिक असल्याचे प्रस्तावक अभ्यंकर यांनी नमूद केले. प्रा. कैलास चव्हाण, गिरीश शेरेकर, प्रा. संतोष बनसोड, प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, प्राचार्य देवेंद्र गावंडे, प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, प्रा. प्रशांत विघे आणि प्रा. डॉ. संतोष कुटे यांच्यासह अनेक सदस्यांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला.

## विद्यापीठाचा जी.एच. रायसोनी विद्यापीठासोबत शैक्षणिक व संशोधनात्मक करार

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक आणि संशोधनात्मक उपक्रम राबविण्यासाठी जी.एच. रायसोनी विद्यापीठासोबत सामंजस्य करार करण्यात आला असून या माध्यमातून माहिती, तंत्रज्ञानासोबत संशोधनात्मक उपक्रमांचे आदानप्रदान होईल, असे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केले.

विद्यापीठ आणि जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती यांच्यात नुकताच शैक्षणिक आणि संशोधनात्मक सामंजस्य करार संपन्न झाला आहे. यावेळी जी. एच. रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, अमरावती विद्यापीठाचे नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, रायसोनी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. स्नेहसील जयस्वाल, जनसंपर्क अधिकारी अनिता यादव यांच्यासह विभागप्रमुख आणि कर्मचारी उपस्थित होते.

सदर करार शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या उज्वल भविष्यासाठी अत्यंत्य उपयुक्त आणि महत्वाचा ठरणारं आहे. दहा मुद्द्यांना अनुसरून हा सामंजस्य करार करण्यात आला आहे. यामध्ये वैज्ञानिक संबंध आणि परस्पर सहकार्य वाढवणे, दोन्ही विद्यापीठातील विद्यार्थी आणि शिक्षक यांना आवडणा-या क्षेत्रातील माहिती, साहित्य आणि वैज्ञानिक माहितीची देवाणघेवाण या कराराच्या माध्यमातून होणार आहे.

# ऑपरेशन प्रस्थानची दखल राज्यस्तरावर घेतली जाणार

## मुख्यमंत्री फडणवीस यांची पोलिस ठाण्यात भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०यवतमाळ**

जिल्हा पोलिस दलाच्यावतीने राबवण्यात येत असलेल्या ऑपरेशन प्रस्थानअंतर्गत तीन टप्प्यात विविध उपक्रम राबवण्यात आले आहेत. या उपक्रमांची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्या उपक्रमांचे कौतुक केले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोमवारी दि. २९ सप्टेंबर रोजी जिल्हा दौऱ्यावर आले असता त्यांनी सुरुवातीला शहरातील गोधनी मार्गावर नव्याने इमारत तयार झालेल्या अवधूतवाडी पोलिस स्टेशनला भेट देऊन तेथील व्यवस्थेची पाहणी केली.




यावेळी त्यांच्या सोबत जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, माजी मंत्री मदन ऐरावार, आमदार राजू तोडसाम, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी विकास मीना, पोलिस अधिक्षक कुमार चिंता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, माजी खासदार रामदास तडस आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी पोलीस प्रशासनातर्फे २७ लाख ११ हजार १११ रुपयांच्या निधीचा धनादेश पूरग्रस्तांच्या मदतीसाठी फडणवीस यांना सुपूर्द केला.

अवघ्या एका दिवसात २७ लाख रुपये जमा यंदा पावसाने राज्यात सर्वत्र हाहाकार माजवला आहे. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या आवाहनाला सर्वांनी लगेच साथ देत सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी अवघ्या एका दिवसात आपापल्या परिने पैसे दिले. त्यात अवघ्या एका दिवसात २७ लाख ११ हजार १११ रुपये गोळा झाले. या मदतीचा धनादेश देण्यात आला.

# अचलपूर 'एपीएमसी'ची आमसभा ठरली वादळी अँटी चेंबरमधील नेत्यांचे फोटो चर्चेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अचलपूर**

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीची सोमवार, २९ सप्टेंबर रोजीची आमसभा वादळी ठरली असून सभा अर्धा तास तहकूब करावी लागली. अँटी चेंबरमधील नेत्यांचे फोटो आमसभेत गाजलेत. कापूस सेस, कापूस व्यापाऱ्यांचे लायसन्स, अतिक्रमण, ऑडिट नोट यावरही गरमागरम चर्चा झाली. तब्बल चार चाललेली तास बाजार समितीच्या इतिहासातील ही पहिलीच आमसभा ठरली.




ज्या कापूस व्यापाऱ्यांकडून बाजार समितीला साडेसात कोटी वसूल करायचेत्याविषयी बाजार समितीने उच्च न्यायालयात दाद मागावी. अमरावती रोडकडील मार्केट मधील दुकानांसमोरील अतिक्रमण काढण्यात यावे. या विषयांवर आमसभेत एकमत झाल्याचे दिसून आले. ज्यांच्याकडे कापूस सेस थकीत आहे त्यांना बाजार समितीने लायसन्स देऊ नये. यापूर्वी बाजार समितीच्या झालेल्या मासिक सभांमध्येही तीन वेळा हा लायसन्सचा विषय फेटाळल्या गेलाआहे. विनामूल्य अभ्यासिकाशेतकरी व शेतमजुरांच्या मुलांकरिता स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेण्याच्या अनुषंगाने बाजार समितीने अभ्यासिका तयार करून त्यावर तज्ञ मार्गदर्शक ठेवावेत शेतमजूर व शेतकरी यांच्या मुलांना ही अभ्यासिका विनामूल्य उपलब्ध व्हावी. यावर बाजार समितीच्या आमसभेत एकमत झाले असून बाजार समिती या अभ्यासिकेकरिता सुसज्ज अशी इमारत उभी करणार आहे.संत, महापुरुषांची नावेया आमसभेत बाजार समितीच्या सभापती प्रतिभा ठाकरे यांनी स्वतः अर्ज करून मार्केट यार्ड मधील उभ्या असलेल्या धान्य शेडला, इमारतींना संत राष्ट्रसंत यांच्यासह महापुरुषांची नावे देण्याकरिता विषय मांडला गेला. हा विषय सर्वानुमते मान्य केल्या गेल्या असून बाजार समितीतील इमारती आणि मार्केट यार्ड वरील टीन शेड या सर्वांना संत, राष्ट्रसंत व महापुरुषांची नावे दिल्या जाणार आहेत. या सभेकडे सहकार क्षेत्रातील धुरिणांचे लक्ष लागले होते. ही सभा प्रचंड वादळी ठरल्याने येथील सहकार क्षेत्र पार ढवळून निघाल्याची चर्चा अचलपूर बाजार समितीत ऐकायला मिळाली.

# बाजार समिती सभापती, उपसभापतीचे मानधन वाढले, मात्र उत्पन्नाची अट कायम

## सर्वाधिक २५ हजार, सर्वात कमी ५ हजार रुपये मिळणार, सदस्यांच्याही मानधनात होणार वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

पाच वर्षापासून बाजार समिती पदाधिकाऱ्यांचे भत्त्यामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. वाढता खर्च लक्षात घेता संबंधित बाजार समितींच्या उत्पन्नाचे मर्यादेत आता ५ हजार ते २५ हजारांपर्यंत मानधन सभापतींना मिळेल, तसे आदेश पणन संचालकांनी १५ सप्टेंबरला दिले आहेत.



दिवसेंदिवस वाढत जाणारी महागाई, वाढते असलेले पेट्रोल, डिझेलचे दर, बस भाडे या सर्व बाबींचा विचार करता राज्यातील बाजार समित्यांचे पदाधिकारी यांचे मानधन, प्रवास भत्ता व रोज भत्तामध्ये वाढ करण्याची मागणी पणन विभागाकडे सातत्याने करण्यात येत होती. यापूर्वी बाजार समिती सभापती / सदस्यांना १ फेब्रुवारी २०१९ चे परिपत्रकानुसार मानधन व सदस्यांचे भत्त्यात वाढ मिळत होता.याशिवाय महाराष्ट्र शासन राजपत्र (अधिसूचना) दिनांक ५ जुलै २०२३ अन्वये राज्यातील सहकारी संस्थेच्या दैनिक भत्ता व सभा बैठक भत्त्यात वाढ झालेली आहे.यापूर्वी सभापतींचे मानधन सर्वाधिक १२५० ते १० हजारांपर्यंत होते. आता पणन विभागाचे आदेशाने वाढ करण्यात आलेली आहे. यामध्ये बाजार समितीच्या उत्पन्नाच्या मर्यादची अट आहे.मानधनवाढीच्या वाढीव खर्चासाठी शासन कोणताही वाटा अथवा आर्थिक भार उचलणार नाही, वा शासनाची कोणतीही आर्थिक मदत मिळणार नाही. त्यामुळे तोट्यातील बाजार समितींमध्ये यापूर्वीचेच जिल्ह्यात १२ बाजार समित्या जिल्ह्यात भातकुली व चिखलदरा वगळता सर्वच तालुक्यात बाजार समिती आहे. आता पणन विभागाचेच निर्णयानुसार प्रत्येक तालुक्यात बाजार समिती होत आहे. त्यानूसार भातकुली व चिखलदराला बाजार समिती होईल.

राज्यातील बाजार समिती पदाधिकारी यांच्याद्वारा मानधन वाढीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरु होता, अखेर या लढ्याला यश आले आहे.अशी माहिती हरीश मोरे, सभापती, बाजार समिती यांनी दिली.

# जिल्ह्यात ५६ महसूल मंडळांत अतिवृष्टी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

दोन महिन्यांपासून सतत पाऊस व अतिवृष्टी होत आहे. यामध्ये ५६ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली असली तरी, ४० मंडळे अतिवृष्टीपासून 'अनटच' राहिली आहेत. आता पावसाळा संपायला तीन दिवस बाकी असताना सहा तालुके पावसात माघारले असल्याची कृषी विभागाची माहिती आहे.जिल्ह्यात ऑगस्ट ढगाळ महिन्यापासून वातावरण व सतत पाऊस होत आहे. त्यामुळे काही तालुक्यांत सोयाबीन हातचे गेल्याची स्थिती ओढावली आहे. कपाशी, तुरीचेही नुकसान झालेले आहे. 'महावेध'च्या अहवालानुसार चांदूर रेल्वे, तिवसा, मोर्शी, दर्यापूर, अंजनगाव, चांदूर बाजार व धामणगाव तालुक्यात पावसाने सरासरी पार केली आहे. शिवाय, वरूड तालुक्यातही सरासरीच्या ९८ पावसाची नोंद झाली आहे. ही ८८.५ टक्केवारी आहे. गतवर्षी याच तारखेला ९५ टक्के पावसाची नोंद झाली होती. यंदा मात्र ९९ टक्के पावसाळा संपला असताना पावसाची १२ टक्के तूट आहे. सरासरीतही सर्वात कमी पाऊस चिखलदरा व धारणी तालुक्यात झाला आहे.हवामान विभागाचे माहितीनूसार एक नवीन चक्राकार वारे मंगळवारी पूर्व बंगालच्या उपसागरात तयार होत आहेत.

**...ही मंडळे झाली बाधित**

तीन महसूल मंडळांत यंदा तब्बल चार वेळा अतिवृष्टीची नोंद झाली. यामध्ये चिखलदरा, वरखेड व बेनोडा महसूल मंडळांचा समावेश आहे. जून महिन्यात ७, जुलै महिन्यात १७, ऑगस्टमध्ये सर्वाधिक ५३, तर सप्टेंबर महिन्यात १३ मंडळे पावसाने बाधित झाली आहेत. आतापर्यंत धामणगाव तालुक्यात सर्वाधिक १६, अमरावती १०, तिवसा व वरूड तालुक्यात प्रत्येकी आठ मंडळी बाधित झाले आहेत.

# वनिता समाजच्या रंगमंचावर अवतरले कृष्ण, कर्ण अन् कुंती शारदोत्सवात सादर झाले सागर रघुवंशी लिखित 'रथचक्र'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

वनिता समाजच्या वतीने आयोजित शारदोत्सवाच्या निमित्ताने वनिता समाजच्या सभागृहात नुकतेच 'रथचक्र' नाटक सादर करण्यात आले. महाभारतातील कृष्ण, कर्ण आणि कुंती यांच्या आत्मिक संवादावर आधारित या नाटकाची संकल्पना, संहितालेखन आणि दिग्दर्शन सागर रघुवंशी यांचे होते. ध्वनिमुद्रित संवादावर कलावंतांनी उत्तमरीत्या आपल्या अभिनय कलेचे प्रदर्शन केले. कृष्णाची भूमिका अभिजित सदाव्रती, कर्ण वैभव इंगळे तर कुंतीची भूमिका डॉ. मीनाक्षी मस्करे यांनी उत्तमरीत्या सादर केली.जीवनाच्या परिक्रमकेत आयुष्यात येणाऱ्या घटनाक्रमांचे काही नैसर्गिक संकेत असतात ज्याला माणूस कारणीभूत असतो. निसर्ग सतत नैसर्गिक राहण्याची जाणीव देत असतो. ज्यांना निसर्ग कळला त्यांनी त्याला कधीच दोष दिला नाही . जीवनाच्या परिक्रमेत वाट्याला आलेलं आयुष्य नैसर्गिकपणे जगणे ज्यांना साधता आले ती अजूनही कालक्रमण करीत असलेली अजरामर अशी महाभारतातील पात्र कृष्ण, कर्ण आणि कुंती यांच्या जीवनाचे सार रथचक्र या नाटकातून मनोवेधक पद्धतीने मांडण्यात आले. कृष्णाचा पार्श्वस्वर अमरावती आकाशवाणीचे उद्घोषक नितीन भट, कर्णाचा अभिजित सदावर्ती तर कुंतीचा स्वर रसिका वैष्णव यांचा होता. रंगभूषा नीलेश ददगल यांनी केली तर संवादांचे ध्वनीमुद्रण इन्फिनिटी स्टुडिओच्या संकेत दातेराव यांचे होते. नाट्य प्रयोगानंतर संस्थेच्या वतीने नाट्यकलावंतांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन अनुराधा रघुवंशी यांनी केले. याप्रसंगी वनिता समाज संस्थेच्या अध्यक्षा मनिषा काळेले यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य आणि नाट्यरसिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पाऊस दसऱ्याला झोडपण्याची शक्यता : हवामान खात्याचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

नवरात्राच्या सुरुवातीपासूनच विदर्भात पावसाची जोरदार हजेरी लागली आहे. येत्या २ ऑक्टोबरला दसऱ्याच्या दिवशी अमरावती सह संपूर्ण विदर्भात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या समारंभात सहभागी अनुयायींच्या व्यवस्थेसाठी प्रशासनाचा कस लागणार आहे. रावण दहन आणि दुर्गा प्रतिमेच्या विसर्जनातही अडचणी येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शनिवारी रात्री विदर्भाच्या बहुतेक जिल्ह्यात बरसलेल्या पावसाने सोमवारी शांतता बाळगली आहे .

हवामान विभागाच्या निरीक्षणानुसार, पुढील ७ दिवसांपर्यंत मान्सून परतण्यास अनुकूल परिस्थिती नाहीच. पश्चिम विदर्भ ते उत्तर मध्य महाराष्ट्रात सायक्लोनिक सर्क्युलेशन आणि कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे, जे पुढील २४ तासांत दक्षिण-पश्चिमेकडे सरकत हळूहळू कमकुवत होईल.

**म्हणून मान्सूनास विलंब**

बंगालच्या उपसागर आणि अरब सागरात एकाचवेळी १ ऑक्टोबरला कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. यामुळे मध्य भारतात मान्सून ढग पुन्हा सक्रिय होतील. सध्या मान्सून परतण्याचे कोणतेही संकेत नाहीत. सध्या भरूच, उज्जैन, झाशी, शाहजहांपूरपर्यंत मान्सूनचे ढग पोहोचले आहेत.

# धनवाडी ते अडगाव पांदण रस्त्याचे खडीकरण पूर्ण करा शेतकऱ्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अंजनगाव सुर्जी**


अंजनगाव सुर्जी तालुक्यामधील धनवाडी ते अडगाव खाडे या पांदण रस्त्याचे दोन वर्षे आधी मातीकाम पूर्ण झालेले आहे व खडीकरणाच्या कामाला सुरुवात देखील दोन वर्ष अगोदर केली होती परंतु अद्यापही सदर रस्त्यावरील खडीकरणाचे काम पूर्ण झालेले नाही खडीकरणाच्या कामासाठी रस्त्यावर टाकलेले मोठमोठे दगडाचे ढीग शेतामध्ये जाण्याकरिता अडथळा निर्माण करत आहे सध्या स्थितीत सोयाबीन पीक काढणीकरिता आलेले असून टाकलेल्या दगडांच्या ढिगामुळे बैलगाडी ट्रॅक्टर जात नसल्याने वाहतूक होत नसल्याने शेतातील पीक घरी आणणे अशक्य झाले आहे करिता संबंधित कंत्राटदाराला विचारणा केली असता संबंधित कंत्राटदार उडवा उडवी चे उत्तरे देत आहे तरी आता शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये शेतकऱ्यांच्या हितावह आठ दिवसांमध्ये खळीकरणाचे उर्वरित काम पूर्ण करावे अन्यथा सदर रस्त्यावरील शेतकरी रस्त्यावरच उग्र आंदोलन करतील असा इशारा सामाजिक कार्यकर्ते सागर हुरबडे यांनी तहसीलदार साहेब अंजनगाव सुर्जी यांना दिला आहे तेव्हा उपस्थित शेतकरी सुनील पळसकर रामभाऊ डोंगरे शुभम बहिरे मदनराव तायडे गणेशराव खेकडे बाळासाहेब खेकडे उमेश खेकडे निलेश पाटील बहिरे निलेश खंडारे हे उपस्थित होते.

# अमरावती जिल्ह्यातील बंजारा समाजाचे श्रद्धास्थान

## श्री संत चापालाल महाराज संस्थान, नांदुरा व देवरा देवरी - एकतेचे प्रतीक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ तिवसा**

गेल्या काई वर्षापासून नादोरा येथे नवरात्री मध्ये माता लक्ष्मी याडी याची आपल्या संस्थान कमेटी मार्फत घट स्थापण करून या ठिकाणी अखंड नंदादीप प्रज्वलीत करून माता लक्ष्मी याडी याला सम्पूर्ण समाज बांधव व भाविक भक्तांना यश सम्पती समृद्धी व चांगले आरोग्य मिळण्यासाठी नवरात्रा मध्ये नऊ दिवस घट स्थापन करून पुज्या केली जाते व नवमीला श्री. पंडितची राठोड विनोदजी राठोड बाबुसिहजी चव्हाण व कमेटी महा प्रसाद केला जातो. त्याच प्रमाणे आपल्या जिल्ह्यातील देवरा देवरी संस्थान येते नवरात्री उत्सव मध्ये श्री विजुभाऊ राठोड( इजिनियर) मुळ रा. कारला यांनी पुढाकार घेऊन मागील ५ वर्षांपासून मंदिरात घटस्थापना करून अखंड नंदादीप प्रज्वलीत करून सम्पूर्ण मंदिरावर लाइटिंग लावून ९ दिवस उपक्रम राभवतात व नवमीला भाविक भक्ता साठी भव्य महाप्रसाद सुद्धा आयोजित केला आहे. व संस्थानच्या विकासा करिता नेहमी कमेटी सोबत पुढाकार घेतात.



# तुषार भारतीय यांचे निलंबन उठवले; भाजपमध्ये पुनश्च स्वागत

## भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मुंबई भाजप कार्यलयात दिले पत्र






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

अमरावती महानगरपालिका स्थायी समिती माजी सभापती तथा माजी सभागृह नेते तुषार भारतीय यांचे भाजप मधील निलंबन मागे घेतले . मुंबई येथील भाजप कार्यालयात भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण , सरचिटणीस संजय केणेकर , भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये , नवनाथ बन यावेळी उपस्थित होते. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा महत्त्वाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.विद्यार्थी दशेपासून विद्यार्थी चळवळीतून आपल्या समाजसेवेचे सुरुवात तुषार भारतीय यांनी केली, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत तुषार भारतीय यांचे नेतृत्व फुलत गेलं. भाजपा विरोधी पक्षात असताना व वर्तमानात सुद्धा अनेक आंदोलने, विकास कामे व समाज उपयोगी कार्यक्रम सतत तुषार भारतीय यांच्याद्वारे अमरावती शहरांमध्ये राबविले गेले. तुषार भारतीय सारख्या कार्यकर्त्यामुळे अमरावती मनपा मध्ये भाजप ची बाजू अधिक भक्कम झाली.भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तुषार भारतीय यांचे भाजपात स्वागत करताना म्हटले की, आपल्या अनुभवी नेतृत्वाचा भाजपला मोठा उपयोग होणार आहे. आगामी काळात अमरावती जिल्ह्यात भाजपची अधिक ताकद वाढेल, याची खात्री आहे , तुषार भारतीय यांचा पक्षातील निलंबन मागे हा फक्त एक राजकीय निर्णय नाही, तर निष्ठा, संयम आणि जनतेच्या विश्वासाचं यश आहे.

### आपल्या आशिर्वाद आणि विश्वासाच्या बळावर, पुन्हा एकदा सेवेसाठी नव्याने सुरुवात – तुषार भारतीय

आज भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश नेतृत्वाने माझ्यावर विश्वास दाखवला याबद्दल मी मनापासून आभारी आहे. प्रदेशाध्यक्ष श्री रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये भाजप जे माझे घरच आहे. यात पुन्हा सक्रिय झालो. माझ्या अमरावती जिल्ह्यामधील मधील कार्यकर्ते, समर्थक आणि ज्यांनी कायम मला विश्वास दिला त्यांच्या प्रेमामुळेच आज पुन्हा पक्षाच्या माध्यमातून लोकसेवेची संधी मिळत आहे.

आगामी काळात पक्षाच्या ध्येयधोरणानुसार, शिस्त पाळून आणि जनतेच्या अपेक्षांना केंद्रस्थानी ठेवून पूर्ण जोमाने कार्यरत राहाण्या करण्यासाठी शुभेच्छा देतो ..

तुषार भारतीय यांचे पक्षातील निलंबन मागे घेतल्यामुळे अमरावती जिल्ह्यातील राजकीय रणनितीत वेगळीच गती येणार आहे व इतर पक्षासाठी हे मोठे आव्हान ठरणार आहे.तसेच,हा बदल आगामी स्थानिक आणि निवडणुकांमध्ये महत्त्वाचा ठरणार असल्याचे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे. यावेळी माजी महापौर चेतन गावंडे , भाजप नेते प्रशांत शेगोकर , सचिन मोहोड , आकाश वाघमारे , राजेश जगताप प्रामुख्याने उपस्थित होते.

# धार्मिक एकतेचा संदेश; काँग्रेस पदाधिकाऱ्यांचे देवी मंदिरात दर्शन

## पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकत्रित होऊन पायदळ मंदिरात पोहोचले







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने २९ सप्टेंबर २०२५ रोजी अमरावतीचे कुलदैवत आई अंबा माता आणि एकवीरा देवी यांच्या पवित्र व भक्तिमय दर्शन सोहळ्याचे आयोजन मोठ्या श्रद्धा व उत्साहात पार पडले. यावेळी अंबादेवी आणि एकवीरा देवीच्या चरणी सर्वांनी अमरावती जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रार्थना केली.

या पवित्र सोहळ्यात काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. जिल्ह्याचे खा. बळवंत वानखडे, माजी पालकमंत्री ॲड. यशोमतीठाकूर, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, अमरावती शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु शेखावत, माजी महापौर मिलिंद चिमोटे, प्रदेश प्रवक्ते दिलीप एडतकर, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, प्रदेश महासचिव किशोर बोरकर, महिला काँग्रेस अध्यक्षा श्रीमती जयश्री वानखडे यांची विशेष उपस्थिती लाभली. श्री. बालाजी मंदिर, वसंत टॉकीज, अमरावती येथे सोमवारला सायंकाळी ६:३० वाजता सर्व मान्यवर, पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकत्रित होऊन पायदळ मंदिरात पोहोचले. त्यानंतर आई अंबा माता व एकवीरा देवी यांच्या पवित्र दर्शनाचा लाभ घेतला. या प्रसंगी शहर काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, एनएसयुआय, अनुसूचित जाती-जनजाती सेल, अल्पसंख्यांक सेल, सेवादल, शिक्षक सेल, विधी सेल, व्यापारी सेल, पदविधर सेल, उत्तरभारतीयसेल, सहकार सेल, ओबीसी सेल, सोशलमीडिया सेल आणि ट्रान्सपोर्ट सेल यांच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आई अंबा माता आणि एकवीरा देवीच्या चरणी सर्वांनी अमरावती जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रार्थना केली. श्रद्धा, भक्ती आणि एकात्मतेच्या वातावरणात हा पवित्र दर्शन सोहळा अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडला.

# विद्यार्थ्यांच्या हाती झाडू शिक्षक वेळेवर गैरहजर

## विष्णोरा शाळेतील बेजबाबदार कारभार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मोर्शी**

मोर्शी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या विष्णोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षणापेक्षा साफसफाई अधिक केली जाते, अशी स्थिती सध्या निर्माण झाली आहे. या शाळेत विद्यार्थी पुस्तकांऐवजी झाडू घेऊन शाळेच्या स्वच्छतेचे काम करताना दिसत आहेत, तर शिक्षक वेळेवर न हजर राहत कभी भी आवो, कभी भी जाओ अशा पद्धतीने शाळा चालवत असल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे.

शाळेत तीन शिक्षक असूनही वेळापत्रकानुसार उपस्थित राहण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. शाळेच्या गेटसमोर असलेल्या रस्त्यावर मोठे भगदाड पडले असून, ते विद्यार्थी आणि पालकांच्या सुरक्षेसाठी धोकादायक ठरत आहे. याकडे शिक्षक व शाळा प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे भविष्यात अपघात होण्याची शक्यता आहे. या गंभीर समस्येकडे संबंधित प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

शाळेतील आणखी एक गंभीर बाब म्हणजे इमारतीवर दिवसभर माकडांचा विहार असतो. ही माकडे टिनावर उड्या मारून आवाज करतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष भंग होते. यामुळे शैक्षणिक वातावरणावर विपरीत परिणाम होत आहे. पालकांनी या माकडांचा बंदोबस्त करण्याची मागणी शाळा प्रशासनाकडे केली आहे.या सर्व बाबींकडे शिक्षण विभाग व स्थानिक प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे असून, विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि शैक्षणिकदृष्ट्या पोषक वातावरण मिळावे, ही सर्वांचीच अपेक्षा आहे.

# अमरावतीत आदिवासी समाजाचा जनआक्रोश भाकर मोर्चा; आरक्षणात घुसखोरीला तीव्र विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

आदिवासी समाजाच्या हक्काच्या आरक्षणात इतर जातींच्या घुसखोरीला विरोध करत आज अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयावर हजारो आदिवासी बांधवांनी जनआक्रोश भाकर मोर्चा काढला. गळ्यात भाकर, कांदे व मिरच्यांची माळ घालून आंदोलकांनी सरकार व प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात आक्रोश व्यक्त केला.

राज्यात सध्या धनगर, बंजारा आदी काही समाज घटकांकडून अनुसूचित जमातींच्या आरक्षणात समावेश मिळावा यासाठी मोर्चे काढले जात आहेत. याला विरोध म्हणून आदिवासी समाज रस्त्यावर उतरला आहे. आमच्या हक्कात कोणालाही घुसू देणार नाही!, आदिवासी आरक्षण आमचाच अधिकार! अशा घोषणा देत आंदोलकांनी सरकारला इशारा दिला.या मोर्चात महिला, विद्यार्थी, कर्मचारी तसेच युवक-युवतींचा मोठा सहभाग दिसून आला. आंदोलक अर्जुन युनाते यांनी सांगितले की, आमच्या अस्तित्वावर गदा आणणाऱ्या कोणत्याही समाजघटकाला आदिवासी आरक्षणात सामावून घेण्याचा प्रयत्न झाला, तर संपूर्ण राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल.मोर्चा शांततेत पार पडला असला तरी आदिवासी समाजाच्या भावना तीव्रपणे व्यक्त झाल्या.

# पोस्टमनकाका तुमच्या घरी येणार सोबत पत्र, पार्सल घेऊन जाणार !

## काम झाले सोपे : टपाल खात्याची नावीन्यपूर्ण योजना, नागरिकांना रांगेत लागायची गरज नाही

**अरुण जोशी**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

आपल्याला कोणी पाठवलेली पत्रे किंवा पार्सल पोस्टमन घरी आणून देतो. पण, आपल्याला पाठवायचे असेल तर पोस्ट कार्यालय गाठावे लागते; परंतु टपाल खात्याने नवी योजना सुरू केली आहे. ज्याद्वारे घरबसल्या पोस्टाच्या वेब पोर्टलवर पत्र अथवा पार्सलची नोंदणी करायची व त्याचे ऑनलाइन पैसे भरायचे. त्यानंतर पोस्टमन घरी येऊन तुमचे पत्र अथवा पार्सल घेऊन जाईल. यामुळे पोस्ट कार्यालयाच्या रांगेत थांबण्याचा ताप कमी होणार आहे.

टपाल विभागाने एपीटी २.० अर्थात ॲडव्हान्स पोस्टल टेक्नॉलॉजी अंतर्गत ग्राहक पोर्टल सुविधा ४ ऑगस्ट पासून सुरू केली आहे. सध्या या योजनेला कमी प्रतिसाद मिळत असला तरी, भविष्यात मात्र चांगला प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा पोस्ट विभागाला आहे.ग्राहकाने पोर्टलवर आपले पार्सल ज्याला पाठवायचे आहे त्याचे नाव, पत्ता, पिनकोड व स्वतःचे नाव, पत्ता व पिनकोड भरायचे. त्यानंतर पार्सलची साईज व वजन भरल्यावर त्याची रक्कम. तिथेच कळते. तसेच त्या रकमेचा क्यूआर कोड जनरेट होऊन ऑनलाइन पैसे भरता येतात. यासह तिथे सर्व माहितीचा तपशील व बारकोड तयार होतो. त्याची प्रिंट काढून पार्सलला जोडायची. त्यानंतर पोस्टमन येऊन तुमचे पार्सल घेऊन जातो.

**ग्राहक पोर्टल सुविधेचे हे आहेत फायदे**

घरबसल्या ऑनलाइन नोंदणी व घरातून पार्सल पोस्टमन घेऊन जाणार. तुमच्या पार्सलचे ट्रॅक आणि ट्रेस सुविधेद्वारे लाइव्ह लोकेशन समजते. पार्सल पाठविण्याचा खर्च ऑनलाइन समजणार व ऑनलाइनच पेमेंट करता येणार. व्यावसायिकांसाठी वॉलेट पेमेंटचा पर्याय यातून मासिक बिल जनरेट होते. तक्रार निवारणाची सोय उपलब्ध आहे. ही सुविधा सामान्य ग्राहकांसह व्यावसायिक, ई कॉमर्स करणारे, बँका, पतसंस्था यांच्यासाठी अधिक उपयोगी ठरणार आहे.

**या ठिकाणी करा नोंदणी**

पोस्टाच्या www.indiapost.gov.in या बेबसाईटवर जाऊन कस्टमर लाइन हा पर्याय निवडून पत्राची व पार्सलची नोंदणी करायची आहे. या साईटवर सामान्य ग्राहकांसाठी गेस्ट लॉगिनचा पर्याय आहे व व्यावसायिकांसाठी रजिस्टर लॉगिनचा पर्याय आहे.


# मानवतेचा आदर्श!......गुरुद्वारा साहिबमार्फत पूरग्रस्तांना मदतीचा हात

## श्रेयशदादा पोटे पाटील यांची पंजाब पूरग्रस्तांसाठी ५ लाखांची मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

अमरावती जिल्ह्यात समाज सेवेत नेहमी भरीव योगदान देणारे तसेच गरजूंना नेहमी मदत करण्यास तत्पर असणारे अमरावतीचे माजी पालकमंत्री आणि समाजसेवक श्री प्रवीण पोटे पाटील यांचा समाजसेवा प्रति मदतीचा वारसा पुढे चालवत पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील आणि त्यांच्या कुटुंबाच्या वतीने पंजाबमधील विनाशकारी पुरामुळे बाधित नागरिकांना मदत करण्यासाठी मानवता आणि सेवेचे एक अनोखे उदाहरण ठेवले आहे.

आज पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांनी अमरावती येथील गुरुद्वारा श्री गुरु सिंह सभेला भेट दिली आणि पंजाब पूरग्रस्त मदत निधीसाठी कुटुंबाच्या वतीने ५,००,००० (पाच लाख रुपये) मदत दिली.प्रकाश पुंड या प्रसंगी विशेष उपस्थित होते. गुरुद्वारा श्री गुरु सिंह सभेचे अध्यक्ष अमरजोत सिंग जग्गी म्हणाले की, पोटे कुटुंब नेहमी सामाजिक बांधिलकी जपतात ते नेहमी संकेत काळात मदत करतात अशा सामाजिक उपक्रमामुळे समाजात मानवता आणि सहकार्याची भावना अधिक बळकट होते.



गुरुद्वारा श्री गुरु सिंह सभेच्या अमरावती येथील व्यवस्थापन समितीच्या वतीने सचिव डॉ. निक्कू खालसा यांनी प्रवीण पोटे-पाटील आणि पोटे पाटील कुटुंबाचे आभार मानले आणि सांगितले की पोटेजींचे समाजाप्रती असलेले समर्पण नेहमीच अतुलनीय राहिले आहे. हे दान पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल आणि शेकडो कुटुंबांचे जीवन बदलेल.

पंजाबमधील दुःखद पुरामुळे हजारो कुटुंबे संकटात सापडली आहेत. अशा कठीण काळात, प्रवीण पोटे-पाटील कुटुंबाचे हे योगदान सरबत दा भला (सर्वांचे कल्याण) या शीख परंपरेचे जिवंत उदाहरण असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी गुरुद्वारा गुरुसिंग सभेचे अध्यक्ष अमरज्योतसिंग जग्गी, सचिव डॉ. निक्कू खालसा, खजिनदार रतन दीप सिंग (सोनू) बग्गा, रविंदर सिंग (बिट्टू) सलुजा, राजेंद्रसिंग सलुजा, दिलीप सिंग बग्गा, प्रदीप जी चड्डा, सतपाल सिंग बग्गा, गुरविंदर सिंग राजेश बेदी, अमरजीत सिंग बेदी, राजेंद्र सिंग बग्गा आदी उपस्थित होते. चबडा, कोमल प्रीत सिंग नंदा, गिरीश सिंग सावल, रोहित खुराना, रबजीत सिंग सेठी, वकील सिंग, भाई गुरमान सिंग, सतपाल सिंग, सुमित सिंग आणि संजय कडू उपस्थित होते.

# सेवा पंधरवडात अमरावतीत योजनांचे लाभ वितरण; शेतकऱ्यांना दिलासा देणार 'सात मिनिट संवाद'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

राज्य शासनाच्या सेवा पंधरवडा व छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत अमरावती येथील तहसील कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात विविध शासकीय योजनांचे लाभ लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले. यामध्ये धनादेश, लाभार्थी प्रमाणपत्रे तसेच गृहबांधणीसाठी आवश्यक जागांचे पट्टे यांचा समावेश होता.

या कार्यक्रमात आमदार रवी राणा व आमदार राजेश वानखेडे यांच्या हस्ते लाभांचे वितरण करण्यात आले. उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसीलदार लोखंडे, तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी व युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाद्वारे शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आला. विशेषतः शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत आमदार रवी राणा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रयत्न शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले, आणि 'सात मिनिट संवाद' साधून शेतकऱ्यांचे प्रश्न जाणून घेतले.या संवादादरम्यान, लवकरच नुकसानभरपाईची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असल्याची माहितीही आमदार राणा यांनी दिली.

## नवरात्रीचे नवरंग....

### नवरात्रीचा आज नववा दिवस आजचा रंग - पिंक



गुलाबी रंगाच्या माधुर्यात न्हालेल्या महिला महाविद्यालयातील प्राध्यापिका!संस्कृती, सामंजस्य आणि स्त्रीशक्तीचा मधुर संगम या समूहचित्रातून अवतरला आहे...

# वलगाव रोडवर हिरव्या झाडांची बेधुंद कत्तल; बांधकाम विभाग गप्प का?

## सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ठेकेदारांमध्ये काय सुरू आहे? नागरिकांचा सवाल

शंतनू देशमुख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०चांदुर बाजार**

चांदुर बाजार-वलगाव मार्गावर सुरू असलेल्या रस्ता विकासाच्या कामांतर्गत हिरव्या, परिपक्व झाडांची बेधुंद कत्तल सुरू असून, यामुळे परिसरातील पर्यावरणप्रेमी आणि नागरिक संतप्त झाले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग व ठेकेदारांच्या संगनमताने ही झाडांची हानी होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.



वनविभागाकडून फक्त रस्त्यावर आलेल्या फांद्या कापण्यासाठी परवानगी घेण्यात आली होती. मात्र ठेकेदारांनी संधी साधत बाभूळ, कडुलिंब यासारख्या अनेक वर्ष जुनी झाडे मुळासकट तोडली आहेत. शेकडो वर्षांपासून सावली देणाऱ्या या झाडांमुळे वाहनधारक उन्हाळ्यात या मार्गाला प्राधान्य देत असत. आता मात्र ही हिरवळ नष्ट होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.ठेकेदारांकडून बेकायदेशीर लाकूडतस्करी होत असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, झाडांना रात्री आग लावून सकाळी ती कापून नेली जात असल्याचे प्रकार घडत आहेत. यात शेतकऱ्यांना विनाकारण दोष दिला जात असून, तस्कर शेतकऱ्यांच्या नावावर झाडांची तोड करत असल्याचा आरोपही झाला आहे.सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक देत आहेत. गेल्या वर्षीही अशीच झाडांची कत्तल झाली, पण कोणतीच कारवाई झाली नाही, अशी आठवण करून देत या झाडांची जबाबदारी कोण घेणार?, असा प्रश्न विचारला जात आहे.दरवर्षी सरकारकडून लाखोंचा निधी खर्च करून झाडे लावली जातात, मात्र लावलेली झाडं टिकवण्यासाठी कुणीही पुढे येत नाही. आजही वलगाव रोडवर मागील झाडलावणीचे एकही झाड दिसत नाही.कोरोना काळात ऑक्सिजनसाठी लोक तडफडले, तेव्हा झाडांचे महत्त्व उमगले, पण आता पैशाच्या लालसेने झाडांची कत्तल सुरू आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांवर कारवाई होणार का? की यंदाही हे प्रकरण गप्प बसण्यातच संपणार?, असा थेट सवाल नागरिक विचारत आहेत.

